# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/12/2022 (बुधवार) दुपार

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

### एकुण ५,९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**पो.स्टे. कुही :—** दिनांक २७/१२/२०२२ रोजी वेळ ०४.५० वा. स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील पथक उमरेड उपविभागात रात्रगस्त पेट्रोलींग करीत असतांना पोलीस स्टेशन कुही परीसरात गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, भिवापूर रोडनी नागपूरचे दिशेने एका पांढऱ्या रंगाच्या टाटा योद्धा गाडीमध्ये गोवंश जनावरांची अवैधरीत्या वाहतूक होणार आहे अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून कुही फाटा येथे नाकाबंदी करीत असताना एक पांढऱ्या रंगाची टाटा योद्धा गाडी क्र. MH-31/FC-1090 ही संशयितरित्या येतांना दिसली. सदर वाहन चालकास थाबंण्याचा ईशारा केला असता त्याने आपल्या ताब्यातील वाहन थाबंविले. सोबत असलेल्या स्टाफ च्या मदतिने वाहन चेक केले असता त्या मधिल आरोपी नामे १) कृणाल अभिमन शेंडे, वय २३ वर्ष, रा. दिघोरा भिवापूर २) दिनेश गोपीचंद सतीबावणे, वय ३२ वर्ष, रा. आमगाव ता. पवनी जि. भंडारा ३) रहमान, रा. गड्डी गोदाम नागपूर यांनी पांढऱ्या रंगाची टाटा योद्धा गाडी क्र. MH-31/FC-1090 किंमती ५,००,०००/—रूपयाचे वाहनामध्ये मागच्या डाल्यामध्ये एकुण ०९ गायी व ०१ वासरू किंमती अंदाजे ९५,०००/—रू. असा एकुण ५,९५,०००/—रूपयाचा मुद्देमाल ज्यांचे चारही पाय निर्दयतेने दोरीने बांधून त्यांना खाली पाडून गुदमरलेल्या स्थितीत दाटी वाटीने तसेच त्यांची कोणतीही चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता घेऊन जात असल्याचे दिसुन आल्याने वरील आरोपीतांविरूद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० कलम ११(१)(डी) व महाराष्ट्र प्राणी सुरक्षा अधिनियम सहकलम १९७६ कलम ५ अ (२), ९ मोटार वाहन कायदा १३०/१७७ व सहकलम १०९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपींतांची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाई करीता पोलीस स्टेशन कुही यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री विशाल आनंद, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रा.,मा. श्री डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रा., मा. श्री. संजय पुरदरे पोलीस उप अधीक्षक (गृह) यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार मिलींद नादुरकर, पोलीस नाईक मयुर ढेकळे, अमृत किनगे यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर